## महाराष्ट्र शासन
## पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
## विभागीय कार्यालय, नाशिक विभाग

1411, सरकारवाडा, सराफ बाजार, बोहोरपट्टी,
नाशिक – 422001.

दुरध्वनी क्रमांक :0253-2507496
ईमेल –adanashik@gmail.com

---

जा.क्र.स्मारके/ जाहीरात / 229 /2026,

दिनांक : 16 MAR 2026

प्रति,

मा. सहाय्यक संचालक, (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नविन प्रशासकीय इमारत, 17 वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई-400032.

**विषय** :- पुरातत्त्व विभागाच्या नामिकासुचीतील नसलेल्या नविन वास्तुविशारदांकडून इच्छुकता मागविण्याचा स्वारस्य प्रकटन मागविण्या करिता राज्य स्तरावरील सर्वाधिक खप असलेल्या कोणत्याही एका दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

पुरातत्त्व विभागाच्या नामिकासुचीतील वास्तुविशारदांकडून इच्छुकता मागविण्याचा स्वारस्य प्रकटन राज्य स्तरावरील सर्वाधिक खप असलेल्या कोणत्याही एका दैनिक वृत्तपत्रात एक वेळ प्रसिध्दीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. कृपया त्यास प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| 1) कार्यालयाचे नाव | : | सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, विभागीय कार्यालय, नाशिक |
| 2) जाहिरातीचे देयक पाठविण्याचा पत्ता | : | सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, 1411, सरकारवाडा, सराफ बाजार, बोहोर पट्टी, नाशिक-422001. |
| 3) जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक | : | दि. 07/03/2026 रोजी किंवा तत्पूर्वी |
| 4) प्रसिध्दीची पातळी व वर्तमान पत्र | : | राज्यस्तरावरील सर्वाधिक खप असलेला कोणताही एक दैनिक वृत्तपत्र |

सोबत :- स्वारस्य प्रकटन.

( अमोल. ना. गोटे )
सहाय्यक संचालक (पुरातत्व),
नाशिक विभाग.

प्रत:-

1. मा. संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर .

# स्वारस्य प्रकटन (2025-26) क्र. 1,

सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नाशिक यांच्या अधिपत्याखालील स्मारकांचे संवर्धन व विकास आराखडे (Site Management Plan) नामिकासूचीमध्ये नसलेल्या नवीन वास्तुविशारदांकडून (Fresh Pass out) तयार करुन घेण्याकरीता खालील निकषांच्या अधिन राहून वास्तुविशारदांकडून निकषांची निश्चिती करणेबाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नाशिक या कार्यालयास सदर प्रस्ताव सादर करण्यात यावे.

**अटी व शर्ती :-**

1. वास्तुविशारदांनी Conservation Architecture या विषयामध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेली असावी (उत्तीर्ण होऊन ०५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झालेला नसावा). तसेच त्यांनी Council of Architecture या संस्थेचे प्रमाणपत्र स्पर्धेमध्ये जिंकून आल्यानंतर सादर करणे बंधनकारक असेल.
2. सदर स्पर्धा सहाय्यक संचालक (पुरातत्व), विभागीय कार्यालय, नाशिक यांनी प्रमाणित केलेल्या तुलनेने कमी महत्त्वाच्या राज्य संरक्षित स्मारकांसाठी लागू असेल.
3. संचालनालयाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात हा आराखडा बनविणे बंधनकारक असेल.
4. दस्तऐवजीकरणासाठी पारंपारिक तंत्राबरोबर आधुनिक तंत्रज्ञान (Photogrammetry, Drone Survey, GIS Mapping इ.) आवश्यकतेनुसार वापरणे आवश्यक आहे.
5. जतन-संवर्धनाच्या सद्यस्थितीमध्ये त्याचे Conditional Documentation, छायाचित्रे, आराखडे या स्वरुपात असणे अपेक्षित आहे.
6. आपत्ती व्यवस्थापन हा स्थानिक परिस्थितीचा विचार करुन त्या-त्या स्मारकाशी निगडीत आवश्यक बाबींचा समावेश करुन तयार करण्यात आलेला असावा.
7. जतन संवर्धन कामाचे ढोबळ /सविस्तर अंदाजपत्रक त्या-त्या वर्षातील प्रचलित राज्य दरसूचीनुसार (S.S.R) आणि दरसूची बाह्यबाबींचे दर (Non S.S.R Item) बाबींचे दर बाजारभावानुसार अभ्यास करुन दर पृथ्थ:करण करुन तयार करण्यात यावे.
8. तयार केलेले स्थळ व्यवस्थापन आराखडे तपासणीकरिता परीक्षण मंडळाची स्थापना करण्यात येईल आणि परिक्षण मंडळाचा निवडीबाबतचा निर्णय अंतिम असेल.
9. वास्तुविशारदांना एकापेक्षा अधिक स्मारकांच्या स्पर्धेत भाग घेता येईल.
10. सदर आराखडा ३१/०७/२०२६ पर्यंत सादर करणे बंधनकारक असेल.
11. प्रस्ताव A-4साईजच्या Protrateआकारात PDFस्वरूपातअसावा,शब्दाचा फॉन्ट NewTimes Roman Font Size-12 असावी.
12. प्रस्तावातील नकाशे (Drwaings) A-3 Sheet वर असावेत, प्रस्तावास दोन्ही बाजूने Hard Bound Cover असावे.
13. प्रस्तावातील सर्व माहितीचे स्वामित्व महाराष्ट्र शासनाचे राहील.
14. या स्पर्धेत जे वास्तुविशारद यशस्वी होतील त्यांचे नाव नामिकासुचित समाविष्ट होण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल. या स्पर्धेत विजेत्यांना शासनाकडून कोणतेही मानधन देण्यात येणार नाही, तसेच त्या स्मारकाचा संवर्धन आराखडा तयार करण्याची व्यावसायिक संधी देण्यात येईल.
15. स्मारकांची यादी, स्थळ व्यवस्थापन आराखडा मसूदा(SMP), इच्छुकता अर्ज https://www.mahaarchaeology.in/ या संकेतीक स्थळावर तसेच ईमेल adanashik@gmail.com वर संपर्क साधल्यास उपलब्ध करून देण्यात येतील.

अधिक माहितीसाठी संपर्क श्री. शरद गोविंद श्रीरामे (जतन सहाय्यक अभियंता) मोबा. 7020964506

इच्छुक वास्तुविशारदांनी आपला इच्छुकता अर्ज या कार्यालयास दि. २३/०३/२०२६ पर्यंत सादर करावा.

०१/०४/२०२६ पर्यंत पात्र वास्तुविशारद यादी जाहीर करण्यात येईल.

**दुरध्वनी क्रमांक:-** 0253-2507496

**ईमेल :-** adanashik@gmail.com

**कार्यालयाचा** पत्ता:- 1411, सरकारवाडा, सराफ बाजार, बोहोरपट्टी, नाशिक – 422001.

स्वाक्षरीत

(अ. ना. गोटे)

सहाय्यक संचालक (पुरातत्त्व),

नाशिक विभाग